पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
प्री-व्हयू थिएटरसाठी डिजीटल सिनेमा प्रोजेक्टर
(DCP) खरेदीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०१७/प्र.क्र.१५१/सां.का.२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ मे, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९.
२) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे पत्र क्र.जा.क्र./पुलदे/ १२५०, दि.२४ एप्रिल, २०१९

प्रस्तावना :

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या मिनी थियटरसाठी डिजीटल सिनेमा प्रोजेक्टर (DCP) खरेदी करण्यास प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी सादर केलेल्या सुधारित रक्कम रु. ५१,६७,५००/- (अक्षरी रुपये एकावन्न लाख सदुसष्ट हजार पाचशे फक्त) च्या मर्यादेत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्यास दि.५ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांनी दि.२४ एप्रिल, २०१९ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार डिजीटल सिनेमा प्रोजेक्टर (DCP) चा पुरवठा व कार्यान्वन मार्च, २०१९ पूर्वी न झाल्याने डिजीटल सिनेमा प्रोजेक्टर (DCP) पुरवठादारास रक्कम अदा करण्यात आलेली नाही. आता डिजीटल सिनेमा प्रोजेक्टरचा (DCP) पुरवठा व कार्यान्वन झाले असल्याने पुरवठादारास देय रक्कम अदा करण्याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांनी प्रस्तावित केल्यानुसार डिजीटल सिनेमा प्रोजेक्टर (DCP) चा पुरवठा व कार्यान्वन झाले असल्याने या कामी रु. ५१,६७,५००/- (अक्षरी रुपये एकावन्न लाख सदुसष्ट हजार पाचशे फक्त) च्या मर्यादेत खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. यासाठीचा होणारा खर्च मागणी क्र. झेडडी- २, २२०५ कला व संस्कृती (०७), कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५ १४६३), १३- कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५०९१५४२०७४०२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aababfa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2019.05.09 15:47:16 +05'30'

(प्र. म. महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) मुंबई
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४. उप सचिव (व्यय-१५), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई
५. अवर सचिव, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवड नस्ती, सां.का.२.